## निशाणी क्र. १ खालील आदेश
## (दिनांक : १८/११/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तुत अर्जाद्वारे तिने सदर अधिनियमांचे कलम २३ सहकलम २०(१)(घ) अन्वये अंतरिम पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. **अर्जदाराची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे:**

अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक २४.०६.१९९७ रोजी पार पडला असून सदर विवाह संबंधातून त्यांना दोन मुली असून दोन्ही विवाहित आहेत. अर्जदाराने अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, सामनेवाला हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केळझर येथे हेडमास्तर म्हणून कार्यरत आहे. सामनेवाल्याने सहजीवनादरम्यान तिच्यावर शारीरिक, मानसिक तसेच भावनिक अत्याचार केल्याचे अर्जदाराने सविस्तर कथन केले आहे. अर्जदाराच्या मतानुसार सामनेवालाने शाळेतील एका महिला शिक्षिकेसोबत अनैतिक संबंध ठेवून तिच्यावर अत्याचार वाढविले, शिवीगाळ, मारहाण तसेच मानसिक छळ केला. वारंवार मारहाण करून तिला घराबाहेर जाण्यास भाग पाडले. त्यामुळे अर्जदार मुलीकडे नागपूर येथे आश्रित जीवन जगत आहे.

३. अर्जदाराने स्वतःचे कोणतेही उत्पन्न नसल्याचे प्रतिज्ञापत्रामधून नमूद केले असून तिचा मासिक खर्च रु.३५०००/- असल्याचे सांगितले आहे. सामनेवाला हा हेडमास्तर असून त्याचे मासिक उत्पन्न कमीतकमी रु.१,२५,०००/- असल्याचा

दावा अर्जदाराने केला आहे आणि सामनेवाला कडून दरमहा रु.५०,०००/– पोटगी तिने मागितली आहे.

४. सामनेवालाने अर्जातील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. सामनेवालाने त्याचे विवाहसंबंध वैध असले तरी अर्जदाराचे सर्व आरोप हेतुपुरस्सर व खोटे असल्याचे म्हटले. सामनेवालाच्या महणण्यानुसार अर्जदाराच घरकाम न करणे, वाद घालणे, त्याच्या वृद्ध व आजारी आईची काळजी न घेणे यामुळे कौटुंबिक वाद निर्माण झाल्याचे सांगितले आहे. सामनेवाला पुढे असे कथन करते की, तो ४०% अपंगत्व असलेला निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेला व्यक्ती असून त्याला स्वतःच्या व वृद्ध आईच्या देखभालीचा खर्च करावा लागतो. अर्जदारच स्वतःहून मुलीकडे राहायला गेल्याचेही सामनेवालाने म्हटले. तसेच पगार रु.१,२५,०००/– असल्याचे सामनेवाल्याने नाकारलेले आहे परंतु यासंबंधी कोणताही दस्तऐवज सामनेवालाने सादर केलेला नाही.

५. न्यायालयाने मालमत्ता व दायित्वचे शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश देउन ही सामनेवालांचे स्वतःचे मालमत्ता व दायित्वचे शपथपत्र दाखल केलेले नाही.

६. अर्जदार व सामनेवालांचे तज्ञ विधीज्ञ यांचे म्हणणे ऐकले. अर्जदार हिने सामनेवाला यांचे विरुद्ध केलेल्या कथनांचा व कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या तरतुदींचा विचार करता खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | सामनेवाला याने अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार हिने सकृत दर्शनी शाबीत केले आहे का? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २) | अर्जात मागीतलेला तूर्तातूर्त अनुतोष मिळण्यास अर्जदार पात्र आहे का ? | **अंशत: होकारार्थी, अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.२०,०००/- देण्यात येते.** |
| ३) | आदेश काय ? | **अर्ज अंशत: मंजूर** |

**- का र ण मि मां सा -**

**मुद्दा क्र.१ बाबत:**

७. सदर अर्जाचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, अर्जदार व सामनेवाला यांचे विवाह दिनांक २४.०६.१९९७ रोजी संपन्न झाले आहे व त्यांतील दोन्ही मुली विवाहिता असून आज स्वतंत्र घरात राहतात. अर्जदार सध्या तिच्या मुलींच्या घरी नागपूर येथे आश्रित व निवासस्थानी आहे. अर्जदाराने तिच्या मूळ व अंतरिम पोटगी अर्जामध्ये समनावाला यांच्यावर शाब्दिक, मानसिक, भावनिक व शारीरिक छळ तसेच आर्थिक दुरव्यवहार केल्याचे सविस्तर वर्णन केले आहे. उलटपक्षी सामनेवाला यांनी अनेक आरोप नाकारले असले तरी त्यांच्या उत्पन्न, पेन्शन व मालमत्ता याबाबतचे आवश्यक प्रतिज्ञापत्र किंवा पगाराचे कागदपत्र ते पुढे आणलेले नाहीत. अभिलेखात सामनेवाला यांच्या नावाचे आधार, घराचे कर/पावत्या व वीजबिल इत्यादी दाखल असून ते आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

८. कलम २३ अन्वये अर्जाचा निर्णय करताना न्यायालयाने अर्जाची सखोल चौकशी करणे आवश्यक नसते, अंतरिम पटलावर प्रामाणिकपणा व प्रथमदर्शनी पुरावा पहावा लागतो. अर्जदाराने तिचे मालमत्ता व दायित्वचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, ज्यात तिचा स्वतःचा कोणताही उत्पन्नस्रोत नोंदलेला नाही व मासिक खर्च रु.

३५,०००/– असल्याचे दाखवले आहे. दुसरीकडे सामनेवाला ने निर्देशांनुसार स्वतःचे मालमत्ता व दायित्वचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नसल्याने व त्यांचा उत्पन्नाचा दावा पेंशन/निवृत्ती व इतर लाभ याचा ठोस पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे न्यायालयास सामनेवालाकडून adverse inference घेण्याचा अधिकार आहे.

**९.** अर्जदाराच्या कथनांचे सकृतदर्शनी परीक्षण केल्यास असे दिसते की दम्पतीच्या सहजीवनेत वेळीच वाद व कलह झाले आहेत आणि अर्जदारने अनेकदा त्रास सहन करून शेवटी माहेरी जात राहावे भाग पाडले आहे. भारतीय सामाजिक व न्यायनियमानुषंगाने कोणतीही विवाहित स्त्री स्वतःचा सुखी संसार कोणत्याही ठोस कारणाशिवाय सोडून माहेरी राहत नाही. अर्जदाराच्या अर्जातील माहिती व तिच्या प्रतिज्ञापत्रातील तपशील हे कौटुंबिक हिंसाचाराच्या कलमाच्या व्याख्येमध्ये मोडतात. समग्रतः प्रथमदर्शनी दृष्टीने अर्जदाराच्या विरुद्ध कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे असे दिसते. या आधारावर आणि उपलब्ध दस्तऐवजांचा विचार करता अर्जदाराने केलेल्या अंतरिम पोटगीच्या मागण्या विषयी प्रथमदर्शनी आधार आहे. परिणामी अर्जदाराला तातडीने अंतरिम पोटगी देण्याची आवश्यकता व न्याय्यत्व सिद्ध होते; परंतु अंतिम प्रमाण व कालावधी हे पुढील प्रक्रिया व मूळ अपीलातील पुराव्याच्या आढाव्यानंतर निर्णीत करता येईल. अशा कारणांवरून अर्जदार हिच्याविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होते. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>**

**१०.** सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अर्जदार ही सामनेवाल्यापासून वेगळी राहत असून सध्या तिच्या मुलींच्या घरी नागपूर येथे आश्रित आहे. अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्रावरून असे स्पष्ट दिसते की अर्जदाराकडे कोणत्याही प्रकारचे स्वनिर्मित उत्पन्नाचे साधन नाही व तिचा दैनंदिन खर्च मुलींकडून भागवला जात आहे. अशी परिस्थिती असताना अर्जदाराचा सांभाळ करण्याची कायदेशीर व

नैतिक जबाबदारी ही पती म्हणून समनावाला यांच्यावरच येते. यासंदर्भात अर्जदाराने दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रातून तिचा मासिक खर्च रु.३५,०००/- असल्याचे नमूद असून, तीच्या उपजीविकेसाठी ती पतीवर संपूर्णपणे अवलंबून असल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्ज प्रलंबित असताना वाढत्या महागाईच्या परिस्थितीत अर्जदाराला किमान मानवीय जीवनमान चालविण्यासाठी अंतरिम पोटगीची निश्चित आवश्यकता आहे. सद्यस्थितीत अर्जदाराच्या उत्पन्नाचा कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर येत नाही, त्यामुळे अर्जदार उपजीविकेस सक्षम आहे असे म्हणण्यास या टप्प्यावर कोणतेही आधार नाहीत.

**११.** सामनेवाला यांनी स्वतःच्या उत्पन्नाबाबत कोणतेही प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दिलेले नाही, जरी न्यायालयाने तसे करण्याचे निर्देश दिले होते. उलटपक्षी, अर्जदाराने सामनेवालाचा निवृत्तीचे व पेन्शनचे स्पष्टपणे उल्लेख केले असून सामनेवाल्याला दरमहा पेन्शन स्वरूपात किमान रक्कम मिळत असल्याचे नमूद केले आहे. सामनेवाल्याच्या नावावरील घराचा कर, वीजबिल व इतर दस्तऐवजांवरून ते आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, हे स्पष्ट होते. सामनेवालाने त्यांचे कथित कमी उत्पन्न, वाढलेले खर्च, तसेच घरगुती दायित्वे दर्शविण्यासाठी कोणताही कागदपत्रीय पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. कलम २३ च्या तरतुदीनुसार, अंतरिम पातळीवर सामनेवालाने आर्थिक स्थिती लपविली अथवा प्रतिज्ञापत्र न दिल्यास न्यायालयास प्रतिकूल अनुमान काढण्याचा अधिकार आहे.

**१२.** सामनेवाला यांनी त्यांचे उत्पन्न, खर्च किंवा दायित्वे यांचा उल्लेख केवळ नकाराच्या स्वरूपात केला असून अर्जदार कमवती आहे, असे त्यांनी म्हटले असले तरी त्या संदर्भात कोणताही दस्तऐवजी पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार ही १२ वी नापास असून तिच्याकडे कोणतीही नोकरी, कौशल्याधारित व्यवसाय किंवा आर्थिक स्वावलंबनाचे साधन नाही. यामुळे सामनेवालांचा केवळ कथनावर विश्वास ठेवणे शक्य

नाही. अर्जदार ही तिच्या वय, शिक्षणस्तर व परिस्थितीमुळे आजही उपजीविकेस पतीवरच अवलंबून आहे, हे प्रतिज्ञापत्र व परिस्थितीतून दिसून येते.

**१३.** अर्जदाराने सामनेवालाचे उत्पन्न व मालकीची संपत्ती याचे वर्णन केले असले तरी सामनेवालाने त्या बाबींचा ठोस इन्कार केवळ तोंडी स्वरूपातच केला आहे. त्यांनी त्यांच्या पेन्शन, इतर भत्ते किंवा स्थावर मालमत्ता यासंदर्भात कोणतेही पुरावे दाखल केले नाहीत. त्यामुळे अर्जदाराकडून सामनेवाल्याच्या आर्थिक क्षमतेविषयी केलेला सकृतदर्शनी अंदाज पूर्णतः असंगत नाही. अर्जदार सध्या स्वतःचे निवासस्थान सोडून मुलीच्या घरी राहत असल्याने तिने मागितलेल्या भाडे अनुदानाच्या मागणीस या टप्प्यावर पाठिंबा देण्यासाठी कोणतेही दस्तऐवजी पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे भाडे व डिपॉझिट संबंधी अर्जदाराची मागणी अंतरिम टप्प्यावर मंजूर करणे योग्य ठरणार नाही.

**१४.** सद्यस्थितीत सामनेवाला निवृत्त असून स्थिर पेन्शनधारक असल्याचे अर्जदाराने स्पष्टरीत्या नमूद केले आहे. ते सक्षम व कार्यक्षम असून त्यांना मिळणाऱ्या नियमित पेन्शनच्या आधारे अर्जदाराचा सांभाळ करण्यास ते सक्षम आहेत. त्यामुळे अर्जदाराच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, औषध, प्रवास व इतर दैनंदिन खर्च भागविण्यासाठी सामनेवालाकडून अंतरिम पोटगी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. सामनेवालाचे वरील कथनांचा व अर्जदाराच्या परिस्थितीचा एकत्रित विचार करता अर्जदाराच्या सांभाळाची प्रमुख जबाबदारी ही पूर्णपणे सामनेवाल्यावरच आहे.

**१५.** अर्जदाराच्या या मूलभूत गरजांचा विचार करता, तसेच सामनेवालाचा संभाव्य व अंदाजे आर्थिक क्षमतेचा विचार करून अर्जदारास तत्काळ आर्थिक साहाय्य आवश्यक आहे. सामनेवालाकडून प्रतिज्ञापत्र न आल्याने व त्यांची आर्थिक क्षमता अस्पष्ट ठेवल्याने न्यायालयास प्रतिकूल अनुमान काढता येत असून, अर्जदार

उपजीविकेस प्रत्यक्ष गरजू स्थितीत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदारास दरमहा रु. २०,०००/– अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे, असे न्यायालयास वाटते. करिता सदर मुद्दा क्र.२ च्या उत्तर मी अंशतः होय नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ :**

**१६.** वरील सर्व बाबींवरुन, अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. तसेच अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु.४,०००/– मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला याने अर्जदार हिला अंतरिम पोटगी पोटी दरमहा रक्कम रुपये २०,०००/–(रुपये वीस हजार फक्त) अर्ज दाखल तारखेपासून द्यावे.

३) सामनेवाला याने अर्जदार हिला अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ४,०००/– (रुपये चार हजार फक्त) द्यावा.

४) सदर अर्जाची प्रत अर्जदार व सामनेवाला यास विनामूल्य देण्यात यावी.

५) दोन्ही पक्षकारांनी मूळ अर्ज लवकरात लवकर चालवावा.

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.19 11:17:40 +0530

( एस. आर. सातभाई )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
सेलू, जि.वर्धा

**दिनांकः**– १८/११/२०२५

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)